सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६५ | रविवार, दि. ८ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## न्यूझीलंडविरुद्ध इतिहास बदलून भारत विश्वकरंडक जिंकणार का?

### टी-२० वर्ल्डकप : भारतीय संघावर ४ मोठे 'शाप'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या टी-२० विश्वकरंडक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघासमोर चार मोठे ऐतिहासिक अडथळे उभे आहेत. रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या टी-२० विश्वकरंडक २०२६ च्या फायनलमध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यात रंगणारा सामना फक्त विजेतेपदासाठीच नव्हे, तर अनेक ऐतिहासिक शाप मोडण्यासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. गतविजेता म्हणून भारतीय संघ स्पर्धेत दमदार दिसत असला, तरी तिला चार अशी आकडेवारी उलटवावी लागणार आहेत. ज्यांचा भग अद्याप कोणत्याही संघाला जमलेला नाही. या चार अडचणींवर मात करून भारतीय संघ विश्वकरंडक उंचावू शकेल का? याकडे क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे.




**१) गतविजेते विजेते बनलेले नाहीत**

सर्वप्रथम सलग दोन वेळा विश्वकरंडक जिंकण्याचा विक्रम अद्याप कोणत्याही संघाने प्रस्थापित केलेला नाही. आतापर्यंत नऊ हंगाम झाले, तरीही वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि भारताने प्रत्येकी दोन-दोन वेळा विजेतेपद मिळविले असले, तरी एका हंगामानंतर दुसऱ्या हंगामात विजय मिळविता आला नाही. २०२४ चा विश्वकरंडक जिंकणारा भारत यावेळी गतविजेता म्हणून उतरला आहे. त्यामुळे रविवारी विजय मिळविला तर हा दीर्घकाळाचा शाप संपुष्टात येईल.

**२) घरचा संघ विजेता झालेला नाही**

दुसरा मोठा प्रश्न आहे, की घरच्या मैदानावरील यशाचा. टी-२० विश्वकरंडकाच्या दहा हंगामांमध्ये अद्याप एकाही यजमान संघाने अंतिम सामना जिंकलेला नाही. २०१२ मध्ये श्रीलंकेने आपल्या घरच्या मैदानावर फायनल गाठली होती. पण वेस्ट इंडिजकडून पराभव स्वीकारावा लागला. यावेळी भारत हा यजमान संघ आहे, जो अंतिम फेरीत पोहोचला आहे. २०११ च्या एकदिवसीय विश्वकरंडक स्पर्धेत भारताने घरच्या मैदानावर विजेतेपद मिळवून हा शाप मोडला होता. आता टी-२० मध्येही तोच इतिहास घडविण्याची संधी आहे.

**३) रविवारी कधीही विश्वकरंडक जिंकलेला नाही**

तिसरा शाप रविवारच्या दिवसाशी संबंधित आहे. भारताने आतापर्यंत चार विश्वकरंडक जिंकले आहेत. दोन एकदिवसीय आणि दोन टी-२०. परंतु रविवारी टी-२० विश्वकरंडकाचा अंतिम सामना जिंकण्याची बाब भारताच्या नशिबात अद्याप आलेली नाही. १९८३ आणि २०११ चे एकदिवसीय विश्वकरंडक शनिवारी जिंकले. २०२४ चा टी-२० विश्वकरंडक शनिवारीच उंचावला, तर २००७ चा टी-२० विश्वकरंडक सोमवारी जिंकला. याउलट एक टी-२० आणि एक एकदिवसीय विश्वकरंडक स्पर्धेतील अंतिम सामना रविवारी गमावल्याची नोंद आहे.

**४) भारताला कधीही न्यूझीलंडला हरवता आलेले नाही**

सर्वांत कठीण आव्हान आहे न्यूझीलंडविरुद्धचे. टी-२० विश्वकरंडक स्पर्धेच्या इतिहासात भारताने न्यूझीलंडला एकदाही पराभूत केलेले नाही. दोन्ही संघ आतापर्यंत तीन वेळा आमने-सामने आणि तिन्ही वेळा न्यूझीलंडने भारतावर विजय मिळविला. २००७, २०१६ आणि २०२१ च्या स्पर्धांमध्ये. त्यामुळे फायनलमध्ये न्यूझीलंडला पराभूत करणे हे केवळ विजेतेपदासाठीच नव्हे, तर ऐतिहासिक शाप मोडण्यासाठीही आवश्यक आहे.

भारतीय संघ सध्या फेव्हरिट म्हणून ओळखला जात आहे. खेळाडूंचा फॉर्म, गेल्या स्पर्धेतील यश आणि घरच्या मैदानाचा फायदा यामुळे भारतीय संघावर विश्वास व्यक्त केला जातो. पण न्यूझीलंड देखील काही कमी नाही. त्यांनी गेल्या काही वर्षांत भारताविरुद्ध चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे रविवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणारा अंतिम सामना केवळ क्रिकेट सामना न राहता इतिहास घडविण्याची संधी ठरणार आहे.

जय भारताने या चारही अडथळ्यांवर मात केली तर २०२६ चा टी-२० विश्वकरंडक जिंकून तो केवळ गतविजेता राहणार नाही, तर अनेक ऐतिहासिक शाप मोडणारा पहिला संघही ठरेल. क्रिकेटप्रेमींसाठी हा सामना केवळ रोमांचकारी नसून, आकडेवारी आणि इतिहास यांना नवे वळण देणारा ठरेल.

## ठेकेदाराचे बिल थकल्याने स्मशानभूमीच्या शेडचे काम रखडले

### उघड्यावरच अंत्यसंस्कार होत असल्याने नागरिक संतप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील स्मशानभुमीत नवीन शेड बांधण्याचे काम रखडले आहे. परिणामी मृताच्या नातेवाईकांना बाहेरच अंत्यसंस्कार पार पाडावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. पालिकेने ठेकेदाराचे बिल थकविल्याने शेडचे काम रखडले आहे. हे बिल अदा करून लवकर शेड उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

स्मशान भूमीचे नवीन शेड बांधण्यासाठी पालिकेस सुमारे एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या कामाचा ठेका मिहीर हेमंत पवार यांना देण्यात आला होता. श्री. पवार यांनी ९० टक्के शेडचे काम पूर्ण केले आहे. मात्र, बिल थकल्याने दहा टक्के काम अपूर्ण आहे. अखेरच्या क्षणीही उघड्यावर व बाहेर अंत्यसंस्कार करण्याची वेळ येऊन ठेपल्याने मृताच्या नातेवाईकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पालिकेने ठेकेदाराचे बिल अदा करून लवकर काम पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.





"पालिकेच्या विविध विकासकामांसाठी निधी प्राप्त झाला आहे. मात्र, या कामांचे ऑडिट अजून बाकी आहे. ऑडिट झाल्यानंतर बिल अदा केले जाईल. ठेकेदाराला काम करण्याचे आदेश दिले आहेत.

**- गणेश शिंदे, मुख्याधिकारी, अमळनेर**

दरम्यान ठेकेदारा मिहीर पवार यांनी सांगितले, की सुमारे ९० टक्के शेडचे काम पूर्ण झाले आहे. झालेल्या कामाचा मोबदला टप्प्याटप्प्याने मिळाला तर काम पूर्ण करता येईल. जिल्हा नियोजन विभागाने या कामासाठी पालिकेला १ जानेवारी रोजीच चेक क्रमांक (86958) नुसार ४९ लाख ९५ हजार रुपयांचा निधी दिला आहे. मात्र, तरीही पालिकेने बिल अदा केलेले नाही. उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी बिल अदा करण्यात यावे, याबाबत पालिकेस पत्र दिले आहे.



### रस्ताही मोजतोय अखेरची घटका

चोपडा रस्ता हा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्यावर स्मशानभूमी तर आहेच. मात्र, शनी मंदिर, मारोती मंदिर गायत्री मंदिर, वर्णेश्वर महादेव मंदिर तसेच जगप्रसिद्ध श्री मंगळग्रह मंदिरही याच रस्त्यावर आहे. विविध मंदिरांसह श्री मंगळग्रह मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. मात्र, या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरून अवजड वाहने मोठ्या प्रमाणात वापरतात. लहान- मोठे अपघात ही नित्याची बाब झाली आहे. हा रस्ताही अरुंद झाला आहे. हा रस्ता जणू अखेरची घटकाच मोजत आहे, अशा संतप्त भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. पालिकेने या रस्त्याकडे गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

## भारत- न्यूझीलंड फायनल सामन्याचे आज लाईव्ह प्रक्षेपण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ग्रीन ग्रुप व अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघटनेतर्फे भारत- न्युझीलंड फायनल सामन्याचे रविवार, दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता तहसील कचेरीच्या शेजारी एल. ई. डी. स्क्रीनवर लाईव्ह प्रक्षेपण होणार आहे.

क्रिकेटप्रेमींना या रोमांचक सामन्याचा आनंद सामूहिकरीत्या घेता यावा, यासाठी ग्रीन ग्रुप, व अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघाने याचे आयोजन केले आहे. या सामन्याकडे देशभरातील क्रीडारसिकांचे लक्ष लागले आहे. सामन्यातील प्रत्येक चेंडू, चौकार, षटकार आणि उत्कंठावर्धक क्षण मोठ्या स्क्रीनवर पाहण्याचा आनंद काही औरच असणार आहे. क्रीकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने लाईव्ह प्रक्षेपणाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**न्यू प्लॉटमध्येही प्रक्षेपण**

येथील न्यू प्लॉट गणेशोत्सव मंडळ, जगदंब ग्रुप, पिंपळे रोडचा राजा मित्र परिवार, अमळनेर क्रिकेट असोसिएशन व किंग ऑफ किंग्ज् ग्रुपतर्फे रविवार, दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजेला भारत- न्युझीलंड फायनल सामन्याचे लाईव्ह प्रक्षेपण होणार आहे. न्यू प्लॉट गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात एलईडी स्क्रीनवर हे प्रक्षेपण दाखविले जाणार आहे. क्रिकेट प्रेमींनी या सामन्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## फापोरे बुद्रुक वळण बंधारा पाटचारी दुरूस्तीचा मार्ग मोकळा

### बारा गावांची पाणीटंचाई मिटणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील बहुचर्चित ब्रिटिशकालीन फापोरे बुद्रुक वळण बंधारा पाटचारीला लागणारे क्षेत्र निश्चितीसाठी गिरणा पाटबंधारे विभागाने भूमी अभिलेख कार्यालयात जमीन मोजणी फी ई चलनाने भरली आहे. त्यामुळे आता वळण बंधारा पाटचारी दुरुस्ती कामाचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती संघर्ष समिती प्रमुख प्रा. गणेश पवार यांनी दिली आहे. हे काम झाल्यानंतर पाणीटंचाई बारा गावांची पाणीटंचाई मिटणार आहे.

बोरी नदीवरील ब्रिटिशकालीन फापोरे बुद्रुक वळण बंधारा पाटचारी दुरुस्तीच्या भुसम्पादनापोटी जलसंपादन विभागाकडून ५० टक्के रक्कम ४० लाख रुपये सहा महिन्यापूर्वीच भुसंपादन तथा उपविभागीय अधिकारी कार्यालयाला प्राप्त झालेली आहे. मात्र, पाटचारीसाठी प्रत्यक्षात कोणाचे किती क्षेत्र संपादन करावयाचे निश्चित नसल्याने ५० टक्के मोबदलापासून शेतकरी वंचित होते. पाटचारीचे काम देखील सुरु होत नव्हते. प्रा. पवार यांनी या बाबतीत संघर्षाची भूमिका घेतल्याने अखेर कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभाग (जळगाव) यांनी भूमिअभिलेख कार्यालयात गांवनिहाय क्षेत्र मोजणी फी भरली आहे. यात पाटचारीत येणारे हिंगोणे बुद्रुक गावाची जमीन मोजणी फी ८१ हजार रुपये, फापोरे गावासाठी २ लाख १४ हजार ५००, तर अमळनेर भागासाठी ९१ हजार ५०० या प्रमाणे रक्कम अमळनेर भूमी अभिलेख कार्यालयात मिळालेली आहे. तीनही गावांचे अधिग्रहित क्षेत्र मोजणी नंतर बाधित शेतकऱ्यांना ५० टक्के मोबदला वाटप होईल. या पाटचारी कामात कोठेही वनक्षेत्र मोडत नसल्याने कामाला गती मिळणार आहे. बोरी नदीवरून फापोरे बुद्रुक गावाला वळण देत ब्रिटिशकालीन पाटचारीचे पुनः रुज्जीवन करून थेट धार- मालपूर पांझर तलावात पाणी आणण्यासाठी प्रा. पवार तब्बल दहा वर्षांपासून संघर्ष करीत आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास पांझर तलावात बाराही महिने जलसाठा राहील. बारा गावांची पाणी टंचाई मिटेल. सिंचन क्षेत्रातही वाढ होणार आहे.


## 'प्रताप'च्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाचा औद्योगिक अभ्यासदौरा

### सुरतच्या वेलॉक्स ऑटोमेशन कंपनीत घेतली अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरत येथील वेलॉक्स ऑटोमेशन कंपनीला नुकतीच भेट दिली. विद्यार्थ्यांनी या अभ्यासदौऱ्यात आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली.

वेलॉक्स ऑटोमेशन ही कंपनी औद्योगिक ऑटोमेशन स्विचबोर्ड्स निर्मितीमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेली कंपनी आहे. ही कंपनी सुमारे ६० हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पामधून उत्पादन करते. भेटी दरम्यान कंपनीचे हेड इरफान अमन व नेहा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी औद्योगिक ऑटोमेशनची मूलतत्त्वे पीएलसी प्रोग्रामिंग, एससीएडीए प्रणाली, कंट्रोल पॅनल डिझाइन, सेन्सर्स, ड्राइव्हस व स्विचबोर्ड्स निर्मिती प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. इंडस्ट्री ४. ० आणि स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना विविध ऑटोमेशन प्रकल्पांचे आणि स्विचबोर्ड निर्मिती प्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहण्याची संधी मिळाली. उत्पादन प्रक्रियेमध्ये अचूकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी ऑटोमेशन तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरते याची सखोल माहिती देण्यात आली. प्रश्नोत्तर सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी करिअरच्या संधी, आवश्यक तांत्रिक कौशल्ये, इंटर्नशिप व उद्योगातील अपेक्षा याविषयी मार्गदर्शन घेतले. ही औद्योगिक भेट राष्ट्रीय उच्चतर शिक्षा विभागाच्या आर्थिक सहाय्याने आयोजित करण्यात आली. विभाग प्रमुख डॉ. मुकेश भोळे, प्रा. वृषाली वाकडे, भगवान पाटील व पंकज भदाणे यांनी अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले होते. प्रा. वृषाली वाकडे यांनी आभार मानले.




**सुरत : अभ्यास दौऱ्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक वृंद.**

### आजचे अभीष्टचिंतन





**श्री. चंद्रकांत पाटील**
पत्रकार



**श्री. महेश पाटील**
माजी नगरसेवक



**श्री. गौतम मुंदडा**
अमळनेर



**श्री. किशोर पवार**
फोटोग्राफर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# कलंक पुसा..!

महाराष्ट्रात वाढत्या शेतकरी आत्महत्यांवर सरकारने टास्क फोर्स स्थापन करत हा विषय अजेंड्यावर आणला ते बरे झाले. या जिव्हाळ्याच्या आणि एकुणात कृषी समुदायाला दिलासा देणाऱ्या निर्णयाचे आजतरी स्वागत करायला हवे. ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांनी व्यापक राष्ट्रीय कृषी धोरणावर आधारित दिलेल्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सखोल मांडणी करणाऱ्या अहवालाला वीस वर्षे लोटली. कृषी सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या प्रमुख शिफारशी स्वीकारल्या गेल्या नाहीत. त्यातील काही सोयीच्या वा फारशा अडचणीच्या न ठरणाऱ्या तरतुदी धोरणात आणल्या गेल्या. मात्र, शेती तोट्याची बनल्याने होत असलेल्या शेतकरी आत्महत्यांवर ठोस मार्ग काढण्यात राज्यकर्त्यांना अपयश आले आहे, हे मान्य करावे लागेल. विकासाचे प्राधान्यक्रम ठरवताना डावलला गेलेला शेतकरीवर्ग, मध्यमवर्ग मतदाराचे जपले गेलेले ग्राहकहित, त्यातून अनुनयाचे राजकारण करताना शेती आणि शेतकऱ्याच्या प्रश्नांकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक मान्य करण्यास अलिखित नकार दिला गेला. या वस्तुस्थितीमागील कारणांचा शोध घेण्याची तयारी ठेवावी लागेल. ती याचसाठी की, करभारात अडकलेल्या जागतिक व्यापाराच्या लाटा थोपवताना सरकारची दमछाक होताना दिसते. या लाटेत शेती–शेतकरी टिकवण्याचे आव्हान आणखी गडद झाले. आज या प्रश्नाचे गंभीर परिणाम दिसू लागल्याने त्याची दखल घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. वाढत्या शेतकरी आत्महत्या, अर्थव्यवस्थेतील शेतीची अपरिहार्य भूमिका, या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. तो घेताना शेतकरी आत्महत्यांचा हा विषय केवळ कर्जमाफीने किंवा तकलादू योजनांनी सुटणारा नाही, त्यासाठी आणखी एक ठोस पाऊल टाकण्याची गरज सरकारने मान्य केलेली दिसते.

राज्याच्या विकासाचे प्रयत्न सुरू असताना सामाजिक विकासाचा आलेख घटता असेल, तर त्याला विकास तरी कसे म्हणावे ? या विकास निर्देशांकात शेतकरी आत्महत्येचा कलंक कसा पुसावा, असा प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याचे समाधानकारक उत्तर आता तरी शोधावे लागणार आहे. ते सरकारला कृतीतून द्यावे लागेल. टास्क फोर्सच्या कामाची रूपरेषा लक्षात घेता आत्महत्येमागील मानसिक, आर्थिक आणि सामाजिक कारणांवर बरीच चर्चा आधीच झाली आहे. त्याचे अहवाल सरकारकडे आहेत. आता नव्याने काय शोध घेणार? प्रश्न आहेच. सरकारच्या हेतूबद्दल संशय घेता येणार नसला, तरी आव्हान मोठे आहे. ज्या सांख्यिकीच्या आधारे सरकारला जाग आली, ती धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी आहे. आत्महत्या हा गुन्हा असल्याने पोलिस दफ्तरी झालेल्या नोंदीवरून पुढे आलेली ही आकडेवारी आहे. या गंभीर सामाजिक प्रश्नाचे मोजमाप करणारी स्वतंत्र यंत्रणाही अस्तित्वात नसावी, हे त्याहून गंभीर. राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी विभागाच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र हा शेतकरी आत्महत्येचा देशातील प्रमुख 'हॉटस्पॉट्' बनला आहे. गेल्या दोन वर्षांतील आकडेवारीही चिंतेत भर घालणारीच. शेतकरी आत्महत्या प्रभावग्रास्त राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे, म्हणजे सुमारे ३९ टक्के. पाठोपाठ कर्नाटक २३ टक्के, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तमिळनाडू या राज्यांचा समावेश होतो. या अहवालातून आणखी एक धक्कादायक आकडेवारी समोर येते, ती म्हणजे शेतकरी आत्महत्या करतोच, त्याचबरोबर शेतमजूरही गळफास जवळ करतो आहे.

या आकडेवारीनुसार ४ हजार ६९० शेतकऱ्यांनी, तर ६ हजार ९६ शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. त्यातही पुरुषांची संख्या अधिक. तुलनेत महिला हा मरणाचा मार्ग न स्वीकारता जगण्याच्या संघर्षाला हिमतीने, जबाबदारीने सामोऱ्या जाताना दिसतात. देशातील एकूण आत्महत्याग्रास्तांपैकी सुमारे ६६ टक्क्यांहून अधिक शेतकरी आणि मजुरांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी होते आणि आत्महत्येच्या प्राथमिक कारणांपैकी ते एक महत्त्वाचे आहे. गरिबी, दारिद्र्य, तुटपुंजी आणि न परवडणारी शेती, जगण्याच्या बंद झालेल्या अन्य वाटा, ऐन हंगामात धान्याचे दर पाडून शेतकऱ्याची सरकारी यंत्रणांच्या डोळ्यांदेखत केली जाणारी लूट, केवळ कागदावर राहिलेला शेतीमाल हमीभाव, लहरी निसर्ग, जलसिंचनाच्या सोयीसुविधांचा, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, कुटुंबावरील वाढता खर्च, मुलांचे शिक्षण, सामाजिक दबाव, कर्त्या पुरुषातील व्यसनाधीनता, सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव, वैद्यकीय कारणासाठी होणारी लूट अशा काही प्रमुख कारणांनी ही शेतकरी कुटुंबे देशोधडीला लागली. मराठवाडा, विदर्भात मोठ्या संख्येने होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांमागे दडलेल्या अन्य कारणांचाही शोध घ्यावा लागेल. यातील गंभीर वास्तव म्हणजे शेतमजूर हा मूळचा शेतकरी होता. मुंबईत स्थलांतरित झालेला मोठा वर्ग शेतीतून बाहेर फेकला गेलेला आहे. आत्महत्यांमागील आर्थिक, सामाजिक, मानसिक, कौटुंबिक कारणांचा शोध घेता या सर्वांच्या तळाशी शेतकरी कुटुंबाचे तोट्यातले, न परवडणारे अर्थकारण दडले आहे. कारणांचे मूळ येथे आहे. या शेतकरी कुटुंबांचे जीवनमान सुधारताना त्यांना कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य कसे मिळेल, त्यासाठीच्या प्रयत्नांवर धोरणकर्त्यांचा भर हवा. तो न दिल्यास विकासातील हा मोठा अडसर ठरू शकतो. शेतकरी कर्जमाफीसह सरकार शेतकऱ्यांसाठी विविध योजनांवर जो खर्च करते त्यातील किती रक्कम थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचते, याचाही शोध घेतलेला बरा.

## पळासदडे ग्रामपंचायत अपहार प्रकरण!

# ग्रामसभेस महिना उलटूनही कारवाई शून्यच

## जि. प., पं.स. निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील पळासदडे ग्रामपंचायतीतील कथित अपहार, आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचाराच्या आरोपांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र आहे. संबंधित प्रकरणाला २५ दिवस उलटूनही प्रशासनाकडून चौकशी अथवा कुठलीही कारवाई झालेली नाही. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

२६ जानेवारी रोजी पळासदडे येथे झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीतील विविध आर्थिक व्यवहारांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावेळी कथित आर्थिक अनियमिततेबाबत स्पष्टीकरण मागितल्यावर संबंधित ग्रामसेविका यांनी दप्तर चौकात ठेवून ग्रामसभा सोडून निघून गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत गट विकास अधिकारी स्वतः ग्रामसभेला उपस्थित राहत नाही तोपर्यंत ग्रामसभा घेऊ नये, अशी ठाम मागणी केली होती. त्यानंतर ७ फेब्रुवारी रोजी पुन्हा ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेला गटविकास अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. त्यांच्या समोर ग्रामस्थांनी कथित अपहार व आर्थिक अनियमिततेसंदर्भातील पुरावे सादर केले. अधिकाऱ्यांनी या बाबींची नोंद आपल्या नोंदवहीत घेतल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांकडेही तक्रारी दिल्या आहेत. तरीही अद्याप कोणताही ठोस निर्णय किंवा कार्यवाही न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

शासनाने नुकताच मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांमधून प्रशासकीय समिती नियुक्त करण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. मात्र, पळासदडे ग्रामस्थांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. ज्या पदाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, अशा व्यक्तींना प्रशासकीय समितीवर नियुक्त करू नये, असा अर्ज प्रशासनाकडे सादर केला आहे.

आता या प्रकरणात पंचायत समिती अमळनेरचे गट विकास अधिकारी कोणता निर्णय घेतात, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रकरणात लक्ष घालून पळासदडे गावाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच कोणत्याही भ्रष्टाचाराच्या आरोप असलेल्या व्यक्तीला पाठीशी घातल्यास येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे पळासदडे गावात राजकीय आणि प्रशासकीय वातावरण तापले असून, पुढील काही दिवसांत प्रशासन या संदर्भात काय भूमिका घेते याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## सकारात्मक पत्रकारितेचा सन्मान!

# 'पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२५'साठी ईश्वर महाजन यांची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील पत्रकार ईश्वर महाजन यांना व्हॉईस ऑफ मीडियातर्फे 'पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२५'साठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जातो. या पुरस्कारसाठी श्री. महाजन यांची उत्तर महाराष्ट्रातून निवड करण्यात आली आहे. ईश्वर महाजन हे अभ्यासपूर्ण आणि निर्भीड लिखाणासाठी ओळखले जातात. सामाजिक प्रश्न, जनतेच्या अडचणी आणि विविध घडामोडींवर त्यांनी सातत्याने प्रभावी लेखन करत पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. त्यांच्या लेखणीमुळे अनेक सामाजिक विषयांना वाचा फुटली आहे. समाजात जागृती निर्माण करण्याचे काम त्यांनी केले आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत व्हॉईस ऑफ मीडियाने त्यांची निवड करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

त्यांच्या निवडीबद्दल व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राज्य संयोजक गोरक्षनाथ मदने, सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष कल्पेश महाले, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, व्हीओएमचे जिल्हा उपाध्यक्ष जयेशकुमार काटे, सल्लागार उमेश धनराळे, धनंजय सोनार, मिलिंद पाटील, राज्य प्रसिद्धीप्रमुख बापूराव ठाकरे, तालुकाध्यक्ष उमेश काटे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# दोन राज्यांमध्ये पसरलेला एकमेव जिल्हा, थेट रामायणाशी संबंध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील राज्यांच्या सीमा या प्रशासकीय सुलभतेला डोळ्यासमोर ठेऊन तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कोणताही जिल्हा हा एकाच राज्यात असतो. मात्र अशा एक जिल्हा आहे जो २ राज्यांमध्ये विस्तारलेला आहे. याबाबत माहिती जाणून घेऊया.

**भारतातील एकमेव जिल्हा :** चित्रकूट हा भारतातील एकमेव जिल्हा आहे जो उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये विभागलेला आहे. या जिल्ह्याच्या बहुतांशी भागात जंगल आहे.

**भैगोलिक स्थान :** चित्रकूटचे वेगळेपण त्याच्या भैगोलिक आणि प्रशासकीय रचनेत आहे. चित्रकूट जिल्ह्यातील चार तालूके करवी, राजापूर, मऊ आणि मानकपूर हे उत्तर प्रदेशात येतात.

**जिल्ह्याचे मुख्यालय :** चित्रकूट शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय मध्यप्रदेशात आहे. यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण होते जिथे एकाच जिल्ह्यातील रहिवासी दोन वेगवेगळ्या राज्य सरकारांद्वारे शासित असतात.

**उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशचा भाग :** चित्रकूट हा जिल्हा उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांचा भाग आहे, कारण तो उत्तर विंध्य पर्वतरांगेत स्थित आहे, ही पर्वतरांग दोन्ही राज्यांच्या सीमेवर पसरलेले आहे.

**चित्रकूटचे महत्त्व :** चित्रकूटला हिंदू धर्मात मोठे धार्मिक महत्त्व आहे कारण रामायणानुसार, असे मानले जाते की भगवान रामाने त्यांच्या चौदा वर्षांच्या वनवासातील साडेअकरा वर्षे सीता आणि लक्ष्मणासोबत येथे घालवली होती.

## भटक्या कुत्र्याच्या चाव्यात बालक गंभीर जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी रात्री जुन्या बसस्थानक परिसरात एका ९ वर्षीय बालकावर कुत्र्याने हल्ला चढविला. त्याच्या चाव्यात बालक गंभीर जखमी झाला आहे. अविनाश कैलास पांचाळ असे जखमी मुलाचे नाव आहे.


अविनाश हा जुने बस स्थानक परिसरात असताना अचानक एका भटक्या कुत्र्याने त्याच्यावर झडप घालत चावा घेतला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्याला धुळे येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. भटक्या कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## बसचालकाला अडवून शिवीगाळ; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर- पारोळा मार्गावरील बस थांबवून चालक व वाहकाला शिवीगाळ व धक्काबुक्की करण्यात आली होती. ही घटना शुक्रवार, दि. ६ मार्चद रोजी दुपारी सडावण गावाजवळ घडली. या प्रकरणी तीन जणांविरूद्ध येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, की एसटी बस क्रमांक (एमएच२०-२०-२०८२) चालक सकाळी सुमारे साडेसहा वाजता बसवर ड्युटीवर होते. त्यांच्यासोबत वाहक नरहरी युवराज सोनवणे (रा. गांधली, ता. अमळनेर) हे कार्यरत होते. दुपारी सुमारे साडेबारा वाजेच्या सुमारास सडावण गावाजवळ अमळनेरकडे बस येत असताना मोटारसायकलवरून (एमएच१९-डीवाय-६७३६) तीन तरुण भरधाव वेगाने जात होते. अमळनेर-पारोळा रस्त्याचे काम सुरू असल्याने बस चालक बस सावकाश चालवत होता. त्यामुळे मोटारसायकलस्वारांना वेग कमी करावा लागल्याने त्यांनी बस थांबविण्यास सांगितले. बस थांबवल्यानंतर तिन्ही जणांनी चालकाला खाली उतरवून शिवीगाळ केली. तसेच चालक व वाहकाला धक्काबुक्की करून मारहाण करण्याचा प्रयत्न केला. बस रोखून धरली. दरम्यान, सडावण गावातील ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाल्याने तिघे मोटारसायकलस्वार पसार झाले. याप्रकरणी चालकाच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेडकॉन्स्टेबल लक्ष्मीकांत शिंपी तपास करीत आहेत.


प्रा. स्कू. ली. स. पूर्व परीक्षा १९४१. इ०७वी
वाई, (जि. सातारा)
मंगळवार ता. १८-२-४१) विषयः-भूमिति, जमाखर्च (वेळ-सकाळ
भूमिति
टीप—कोणतेही ५ प्रश्न सोडवा प्रत्येक प्रश्नास १० मार्क.
१ कारणें सांगा.
(१) नियमित षट्कोनाकृतीचा प्रत्येक बाह्यकोन ६०° चा असतो.
(२) समांतर-भुज चौकोनाचा एक कोन काटकोन असल्यास बाकीचे सर्व कोन प्रत्येकी काटकोन असतात.
(३) त्रिकोणांत दोन कोन काटकोन किंवा विशाल कोन असूं शकत नाहींत.
(४) समद्विभुज त्रिकोणाचा शिरकोन ४०° असल्यास पायाजवळील प्रत्येक कोन ७०° असतो.
(५) ५" ४" ९" बाजू घेऊन त्रिकोण काढतां येत नाहीं.
२ (अ) समांतर-भुज चौकोनांत समोरा समोरचे कोन समान असतात. हें सिद्ध करा.
(ब) चौकोनांत समोरा समोरच्या बाजूंचे मध्य सांधणाऱ्या रेषांनी समांतर-भुज चौकोन होतो हें सिद्ध करा.
३ (अ) त्रिकोणाच्या दोन बाजूंची वजाबाकी तिसरीपेक्षां कमी असते हें सिद्ध करा.
(ब) वर्तुळांत ज्या ही व्यासापेक्षां लहान असते हें सिद्ध करा.
४ (अ) त्रिकोणाच्या दोन बाजू जर असमान असतील तर मोठ्या बाजू समोरील कोन मोठा असतो हें सिद्ध करा.
(ब) ७·५ सें. मी. रेषा घेऊन तिचे २:३ याप्रमाणांत दोन भाग करा.
५ (अ) त्रिकोणाच्या दोन बाजू जर समान असतील तर त्या बाजू समोरील कोनही समान असतात हें सिद्ध करा.
(ब) अबक△त अब=अक. बक वाढवून अड सांधले तर अड>अक हें सिद्ध करा.
६ आकृति काढा.
(१) कोनमापकाशिवाय १२०° चा कोन काढा.

**जुनी सातवी म्हणजे आताचा "पदवीधर" खर वाटत नाही, ना मग सोडवा पेपर सन १९४१ सालचा इयत्ता ७ वी चा पेपर.. आज कुणाला जमेल का ?**

## पालिकेच्या कंत्राटी कामगारांची व्यथा..!

# ठेकेदाराने 'पीएफ' जमा न केल्याने आयुक्तांकडे तक्रार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेतील घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांचा संबंधित ठेकेदाराने २०२२ पासून भविष्य निर्वाह निधी (पीएफ) जमा केलेला नाही. परिणामी कामगारांवर अन्याय झाला असून, ठेकेदाराची चौकशी करावी. भविष्य निर्वाह निधी जमा करावा, अशी मागणी या कामगारांनी केली आहे. याबाबत आयुक्तांकडे त्यांनी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.

पालिकेचा घनकचरा व्यवस्थापन ठेका रामदास बाळू पवार (ग्रीन वे एम्पायर) यांना देण्यात आला आहे. त्यांच्याकडे ६० कामगार काम करत आहेत. मात्र, २०२२ पासून ठेकेदाराने भविष्य निर्वाह निधीच जमा केलेला नाही. याबाबत कामगारांनी २०२५ मध्ये तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्यावेळी मुख्याधिकाऱ्यांनी ठेकेदारास पीएफ देण्याचे आदेश दिले होते. मात्र, ठेकेदाराने त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. कामगारांना कायद्याप्रमाणे किमान वेतन देत नाहीत. ठेकेदाराचा पर्यवेक्षक खलील शहा हा साध्या वहीवर पेन्सिलीने वेतन लिहून पेनाने सह्या घेतो. घंटा गाडी चालकाला ९ हजार रुपये आणि क्लिनरला ७ हजार रुपये वेतन देतो. कामगारांनी तक्रार केल्यास कामावरून कमी करण्याच्या धमक्या देतो. वरिष्ठ अधिकारी चौकशीला आले असता प्रत्यक्ष 'पीएफ' यादीत दुसऱ्यांची नावे आणि कामगार दुसरेच असल्याचाही आरोप होत आहे. आजपर्यंत अनेकवेळा तक्रारी करून तत्कालीन नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले.

> घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कामगारांचा पीएफ ठेकेदाराने कापलाच पाहिजे. याबाबत ठेकेदाराला नोटीस देऊन मुदत दिली जाईल. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.
> **– गणेश शिंदे, मुख्याधिकारी, अमळनेर**



निवेदनावर राहुल बिऱ्हाडे, योगेश चव्हाण, हेमंत नाईक, संदीप बैसाणे, अविनाश पाटील, शंकर मोरे, गोकुळ मोरे, फिरोज खाटीक, राजेश धाप, जगदीश संदानशीव, दीपक बिऱ्हाडे, दिनकर बिऱ्हाडे, संजय संदानशीव, संतोष बिऱ्हाडे, बबलू बिऱ्हाडे, राहुल बिऱ्हाडे, पवन बिऱ्हाडे यांच्या सह्या आहेत. निवेदनाच्या प्रति भविष्य निर्वाह निधी आयुक्त अनिलकुमार प्रीतम, सहाय्यक आयुक्त मोहित दीक्षित, सहाययक कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, मुख्याधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

**अशा आहेत कामगारांच्या मागण्या**

गेल्या चार वर्षापासून भविष्य निर्वाह निधीची रक्कम थकबाकी व व्याजसह मिळावी. आयडी कार्ड असलेल्या कामगारांची नावे आणि पीएफ भरणा स्लिप मधील नावाची पडताळणी करण्यात यावी. आयुक्तांनी प्रत्यक्ष कामगारांना भेटून त्यांचे जबाब घेऊन चौकशी करावी. कामगारांना संरक्षण द्यावे. भ्रष्टाचार करणाऱ्या कंत्राटदारावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. कंत्राटदाराचे देयकातून कामगारांचा भविष्य निर्वाह निधी कापून घ्यावा.

## अमळनेर भूषण, सेवाव्रती पुरस्काराचे आज वितरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जीवन कला संस्कार केंद्र व श्री पारनेरकर गुरु सेवा मंडळातर्फे (पारनेर) ख्यातनाम बिल्डर्स ओमप्रकाश मुंदडा यांना अमळनेर भूषण व मराठी वाङमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी यांना घ. भी. धांडे पुरस्कार जाहीर झाला आहे. रविवार, दि. ८ मार्च सायंकाळी ७ वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. पारनेर येथील गुरुसेवा मंडळाचे अध्यक्ष गुणेशजी पारनेरकर कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. जळगाव येथील केशव स्मृती समुहाचे अध्यक्ष भरतजी अमळकर प्रमुख पाहुणे असतील. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अशोक रावेरकर यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



## जागतिक महिला दिन विशेष

# सन्मानाचा उत्सव की संघर्षांची जाणीव?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. पण हा केवळ शुभेच्छांचा, गुलाबांच्या फुलांचा आणि सोशल मीडियावरच्या पोस्टांचा दिवस आहे का? की हा दिवस आहे आत्मपरीक्षणाचा. समाज म्हणून आपण स्त्रीच्या सन्मान, सुरक्षितता आणि समानतेसाठी नेमके काय केले याचा हिशेब मांडण्याचा? जागतिक महिला दिनाची संकल्पना ही फक्त उत्सवासाठी जन्माला आलेली नाही. १९०८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये कामगार महिलांनी समान वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मतदानाचा अधिकार यासाठी आंदोलन छेडले. त्या आंदोलनातून उगम पावलेला हा दिवस पुढे युनायटेड नॅशन्सने १९७५ मध्ये याला अधिकृत मान्यता दिली आणि जगभर स्त्री-अधिकारांच्या लढ्याचे प्रतीक म्हणून तो साजरा होऊ लागला. म्हणजेच हा दिवस आहे संघर्षाचा, स्वाभिमानाचा आणि परिवर्तनाचा.

भारतात स्त्री शिक्षणाची टक्केवारी वाढली आहे. अनेक महिला प्रशासन, उद्योग, विज्ञान, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत झेंडा रोवत आहेत. द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान आहेत. वित्त, संरक्षण, अवकाश संशोधन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांत महिलांनी नेतृत्व सिद्ध केले आहे. पण दुसरीकडे घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कार्यस्थळी छळ, बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या यासारख्या समस्या अजूनही विदारक वास्तव म्हणून समोर आहेत. शिक्षण घेतलेल्या, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलेलाही सुरक्षिततेची हमी नाही, ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे. महिलांच्या सन्मानासाठी कायदे झाले, २०१३ चा 'कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा', बालविवाह प्रतिबंध, घरेलू हिंसाचार प्रतिबंध पण कायदे कागदावर असले, तरी त्यांची अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे? समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री सन्मानाचे स्वप्न पूर्ण होणार नाही. 'स्त्री-पुरुष समान आहेत' ही घोषणा आपण सहज करतो. पण घरातील कामांची विभागणी पाहिली, तर अजूनही स्वयंपाकघराची जबाबदारी स्त्रीचीच मानली जाते. नोकरी करणारी स्त्री असो वा गृहिणी तिचा दिवस पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्टांनी भरलेला असतो. तिच्या श्रमाला 'कर्तव्य' म्हणत आपण त्याची किंमत मोजतच नाही.

ग्रामीण भागात तर अजूनही अनेक मुली शिक्षणाऐवजी घरकाम किंवा लवकर लग्नाच्या चक्रात अडकतात. शहरात करिअर करणाऱ्या महिलेला 'घर सांभाळशील का?' हा प्रश्न विचारला जातो. पण पुरुषाला 'घर सांभाळशील का?' असा प्रश्न विचारला जात नाही. हीच मानसिक दरी आहे. स्त्री म्हणजे केवळ नात्यांची ओळख नाही तर आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांतूनच स्त्रीची ओळख ठरवण्याची सवय आपण लावून घेतली आहे. पण ती केवळ कोणाची तरी 'आई' किंवा 'पत्नी' नाही. ती स्वतःच्या स्वप्नांची, ध्येयांची, क्षमतेची स्वतंत्र व्यक्ती आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करताना समाजाच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर दगड-चिखल फेकला गेला, अपमान झाला. पण त्यांनी हार मानली नाही.

आज शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची वाढती संख्या ही त्याच संघर्षाची फलश्रुती आहे. स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणून आपण देवींची पूजा करतो. पण घरातील स्त्रीला निर्णय प्रक्रियेत समान स्थान देतो का? पूजा आणि प्रत्यक्ष वागणूक यातला विरोधाभास आजही जीवंत आहे. स्त्री रात्री उशिरा सुरक्षितपणे रस्त्यावर चालू शकेल का? हा प्रश्न आजही उत्तराच्या प्रतीक्षेत आहे. मुलींना लहानपणापासून 'सावध राहा, असे करू नकोस, तेथे जाऊ नकोस' असे शिकवले जाते; पण मुलांना 'आदर कर, जबाबदारीने वाग' हे कितपत शिकवले जाते? महिला सुरक्षेचे प्रश्न केवळ पोलिस प्रशासनापुरते मर्यादित नाहीत; ते सामाजिक संस्कारांशी जोडलेले आहेत. घरापासून शाळेपर्यंत आणि माध्यमांपासून मनोरंजनापर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा शक्तिशाली मंच आहे. महिलांना स्वतःचा आवाज मांडण्याची संधी मिळाली आहे; पण त्याचबरोबर ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर छळ, अपमानास्पद टिप्पणी यांचाही सामना करावा लागतो. एका बाजूला महिला पायलट, शास्त्रज्ञ, खेळाडू म्हणून देशाचा अभिमान वाढवत आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कपड्यांवर, व्यक्तिमत्त्वावर टीका केली जाते. स्त्रीची कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्य रूपावर अधिक चर्चा होते, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. महिला दिनी भाषणे, सन्मान सोहळे, पुरस्कार हे सर्व महत्त्वाचे आहेत पण तेवढ्याने परिवर्तन घडणार नाही. बदलाची सुरुवात घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, समान संस्कार, समान अपेक्षा दिल्या पाहिजेत. शाळांमध्ये लिंग-संवेदनशील शिक्षण आवश्यक आहे. माध्यमांनी जबाबदारीने स्त्रीप्रतिमा मांडली पाहिजे. राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत त्यांचा आवाज अधिक प्रभावी झाला पाहिजे, स्त्री रोज लढते कधी घरात, कधी कामावर, कधी समाजात आणि कधी स्वतःच्या मनात. तिच्या डोळ्यात स्वप्ने असतात पण त्यांना पूर्ण करण्यासाठी तिला अनेक अडथळ्यांवर मात करावी लागते. जागतिक महिला दिन हा तिच्या संघर्षाला सलाम करण्याचा दिवस आहे. तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि सहनशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा दिवस आहे तिच्या वेदना समजून घेण्याचा. तिच्या आवाजाला ऐकण्याचा आणि तिच्या सोबत उभे राहण्याचा. ८ मार्थ हा फक्त कॅलेंडरवरील एक दिवस नाही; तो समाजाच्या प्रगतीचा आरसा आहे.

आपण खरोखरच स्त्रीला समानतेचे स्थान दिले आहे का? की अजूनही ती अनेक बंधनांत अडकलेली आहे? महिला दिनाच्या शुभेच्छा देताना आपण एक वचन देऊ या स्त्रीला केवळ सन्मानाचे शब्द नव्हे, तर समानतेची संधी देऊ, तिच्या स्वप्नांना आकाश देऊ आणि तिच्या सुरक्षिततेची हमी देऊ. स्त्री सशक्त झाली, तर समाज सशक्त होईल. कारण स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नाही तर ती राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. जागतिक महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीला मनापासून सलाम तिच्या अस्तित्वाला, तिच्या संघर्षाला आणि तिच्या उज्वल भविष्यासाठीच्या आशेला. हा दिवस उत्सवाचा असो पण त्याहून अधिक परिवर्तनाचा असो. स्त्री ही शक्ती आहे, संवेदना आहे, संघर्ष आहे आणि सृजन आहे. तिच्याशिवाय समाज अपूर्ण आहे; तिच्या सन्मानाशिवाय प्रगती अपूर्ण आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना आर्थिक स्वातंत्र्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतः कमावणारी स्त्री निर्णय घेण्यास अधिक सक्षम होते. स्वयं-सहाय्यता गट, स्टार्टअप्स, लघुउद्योग यामुळे अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळविले आहे. परंतु वेतनातील असमानता अजूनही दिसते. समान कामासाठी समान वेतन ही संकल्पना अजून पूर्णत्वाला गेलेली नाही. ग्रामीण शेतमजुरीपासून ते कॉर्पोरेट कार्यालयांपर्यंत महिलांना अनेकदा कमी मोबदला दिला जातो. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ पैसा नव्हे; तो आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सन्मान यांचा पाया आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवे आकाश लाभो, स्वप्नांना नवी दिशा मिळो आणि आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर सन्मान, सुरक्षितता आणि समानतेची साथ लाभो, हीच सदिच्छा.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना
दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे
मन:पूर्वक शुभेच्छा!

# आपण खात असलेले तूप खरोखर प्युअर आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भेसळयुक्त तुपाच्या काळात घरच्या घरी शुद्धता तपासण्यासाठी या काही सोप्या आणि प्रभावी टिप्स

**हातावर घासून पाहा :** थोडे तूप तळहातावर घेऊन घासल्यास जर ते त्वचेत शोषले गेले आणि छान सुगंध आला, तर ते तूप शुद्ध आहे.

**गरम करून तपासा :** तूप गरम केल्यावर जर ते लगेच विरघळून गडद तपकिरी रंगाचे झाले, तर ते शुद्ध आहे; पिवळसर झाल्यास त्यात भेसळ असू शकते.

**पाण्याचा वापर :** एका ग्लास पाण्यात एक चमचा तूप टाका. जर तूप पाण्यावर तरंगले, तर ते शुद्ध आहे आणि खाली बसल्यास त्यात भेसळ आहे.

**रंग आणि कणीदारपणा :** शुद्ध गाईचे तूप दाणेदार असते आणि त्याचा रंग हलका पिवळसर असतो.

**मिठाची चाचणी :** तुपात थोडे मीठ आणि हायड्रोक्लोरिक ॲसिड मिसळल्यास जर त्याचा रंग लाल झाला, तर समजावे की त्यात वनस्पती तूप मिसळले आहे.

**फ्रीजमध्ये ठेवून पाहा :** तूप फ्रीजमध्ये ठेवा. जर ते पूर्णपणे एकाच थरात गोठले, तर ते शुद्ध आहे; वेगवगेळे थर दिसल्यास त्यात तेलाची भेसळ असू शकते.

**आयोडीन टेस्ट :** विरघळलेल्या तुपात दोन थेंब आयोडीन टाकल्यास जर रंग निळा झाला, तर त्यात बटाटा मिसळला, हे स्पष्ट होते.

# क्रांतिकारी इन्दू भूषण रॉय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज त्या १९ वर्षांच्या क्रांतिकारी तरुणाची गोष्ट, ज्याने सेल्यूलर जेलमध्ये स्वतःलाच फाशी लावली. कारण त्याचा स्वाभिमान जीवंत होता.

त्याचे नाव होते इन्दू भूषण रॉय.

१९०८ च्या अलिपोरे बॉम्ब केसमध्ये या तरुण क्रांतिकाऱ्याला 'काळ्या पाण्याची' शिक्षा झाली. अंदमानच्या त्या भीषण तुरुंगात कैद्यांकडून बैलासारखे घाणा ओढून तेल काढून घेतले जायचे.

**थकलात तर शिक्षा – कोडे, अपमान, उपासमार**

१८-१९ वर्षांचे वय. आज ज्या वयात स्वप्ने पाहिली जातात त्या वयात इन्दूच्या पायात जड बेड्या होत्या. हात रक्ताळलेले, अंगावर कोड्यांचे व्रण आणि समोर निर्दयी जेलर. **२९ एप्रिल १९१२ ती शेवटची रात्र** तापाने फणफणणारा देह, छळ सहन न होणारी वेदना त्यांनी फक्त एवढीच विनंती केली, की 'मला दुसऱ्या तुरुंगात पाठवा. माझे शरीर आता सहन करू शकत नाही.' पण दया नाही. उलट 'हातकडी'ची




शिक्षा. तासन्तास हात वर बांधून उभे राहायचे. पाणी मागितले तरी अपमान.

**स्वाभिमानाची अखेरची लढाई**

त्या रात्री त्यांनी ठरवले, की 'माझे शरीर तुम्ही तोडू शकता, पण आत्मा नाही!' त्यांनी तुरुंगातील आपला फाटका सदरा फाडला. त्याची दोरी बनविली आणि कोठडीच्या खिडकीला गळफास लावला. सकाळी दरवाजा उघडला तेव्हा १९ वर्षांचा तो 'वाघ' शांत झाला होता. त्याने हार मानली नव्हती. त्याने मृत्यूला कवटाळून इंग्रजांच्या क्रौर्याला उत्तर दिले होते. आज आपण मोकळ्या हवेत श्वास घेतोय, कारण अशा कित्येक इन्दू भूषण रॉय यांनी आपली तरुणाई त्या काळकोठडीत अर्पण केली. मोठी नावे आपण लक्षात ठेवतो पण या 'अज्ञात हुतात्म्या'साठी आपल्या मनात एक कोपरा नाही का?

# २१ की उम्र में आयएएस बन रच दिया इतिहास

**सक्सेस स्टोरी**

## ६१ वीं रैंक वाली सबसे कम उम्र की अफसर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत ही नहीं दुनिया की सबसे कठिन परीक्षा मानी जाने वाली यूपीएससी सिविल सेवा परीक्षा हर साल आयोजित की जाती है लेकिन इसमें पास होना सबके बस की बात नहीं होती। हालांकि कुछ ऐसे प्रतिभाशाली होते हैं कि कम उम्र में इस परीक्षा को क्रैक कर इतिहास रच देते हैं। आईएएस आस्था सिंह उन्हीं में से एक हैं जिन्होंने २१ की उम्र में ६१ वीं रैंक लाकर सबसे कम उम्र की कीर्तिमान बनाया।

**यूपीएससी सिविल सेवा परीक्षा**

भारत ही नहीं दुनिया की सबसे कठिन परीक्षा मानी जाने वाली यूपीएससी सिविल सेवा परीक्षा हर साल आयोजित की जाती है लेकिन इसमें पास होना सबके बस की बात नहीं होती।

**सिविल सेवा परीक्षा**

तीन चरणों में आयोजित होने वाली इस परीक्षा में १००० के आसपास पोस्ट आती हैं। हालांकि कुछ ऐसे प्रतिभाशाली होते हैं कि कम उम्र में इस परीक्षा को क्रैक कर इतिहास रच देते हैं।

**आईएएस आस्था सिंह ने रचा इतिहास**

आईएएस आस्था सिंह उन्हीं में से एक हैं जिन्होंने २१ की उम्र में ६१ वीं रैंक लाकर सबसे कम उम्र की आईएएस बनने का कीर्तिमान बनाया।

**बिना कोचिंग ६१ वीं रैंक**

आस्था सिंह ने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा २०२४ में ६१ वीं रैंक हासिल कर मुकाम पाया था। आस्था सिंह ने बिना कोचिंग के अपने



पहले प्रयास में यूपीएससी परीक्षा में ६१ वीं रैंक हासिल की है।

**डीयू से ग्रेजुएशन**

आस्था सिंह ने अपनी स्कूली पढ़ाई मध्य प्रदेश के भोपाल और हरियाणा के पंचकूला से की है। इसके बाद देश की टॉप यूनिवर्सिटी यानी दिल्ली यूनिवर्सिटी के श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स से २०२३ में इकोनॉमिक्स की डिग्री ली।

**पिता फार्मा में क्वालिटी हेड**

आईएएस आस्था सिंह के पिता बृजेश सिंह एक फार्मा कंपनी में क्वालिटी हेड हैं। बचपन से ही आस्था पढ़ाई में होशियार रही हैं।

**पहले बनीं हरियाणा पीसीएस**

साल २०२४ में उन्होंने एचपीएससी एचसीएस परीक्षा में ३१ वीं रैंक हासिल की और हरियाणा सरकार में असिस्टेंट एक्साइज और टैक्सेशन ऑफिसर की ट्रेनिंग में शामिल हुईं।

# यश एका रात्रीत मिळत नाही, ते रोजच्या मेहनतीचे फळ आहे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

युद्धग्रस्त भागातून भारतीयांना सुरक्षित परत आणण्यासाठी संवाद आणि राजनैतिक पुढाकार आवश्यक असल्याने युद्धखोर देशांवर जागतिक स्तरावर दबाव आणत भारताने मोहिमेसाठी अनुकूल वातावरण तयार करावे.

पस्तीस वर्षांपूर्वीच्या आखाती युद्धात कुवेतमध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका करण्याच्या सत्यघटनेवर आधारित दहा वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला 'एअरलिफ्ट' हा हिंदी चित्रपट ब्लॉकब्लस्टर ठरला होता. आखाती युद्ध म्हणून ओळखले जाणारे कुवेतचे युद्ध १९९० मध्ये इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसैन यांच्या नेतृत्वाखाली कुवेतसोबत छेडण्यात येऊन तेलाने समृद्ध असलेल्या कुवेतवर इराकी सेनेने कब्जा केला होता. त्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली ३५ देशांच्या एकीतून लष्करी हस्तक्षेप करत सात महिन्यांनी कुवेत मुक्त करण्यात आले होते. त्यादरम्यान भारताने जगातील सर्वांत मोठी मोहीम राबवत एक लाख ७० हजारांहून अधिक भारतीयांना सुरक्षितपणे बाहेर काढून भारतात आणले होते. त्यावेळी ज्याप्रमाणे भारतीय कुवेतमध्ये अडकले होते तशीच चिंतेची स्थिती सध्या इस्त्रायल – इराण युद्धने ओढवली आहे आणि सरकारने सध्या अडकलेल्या एक कोटी भारतीयांच्या सुटकेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची ग्वाही दिली. मध्य पूर्वेत अडकलेल्या भारतीयांच्या बातम्या सध्या धडकत आहेत आणि त्यामुळे त्यांचे आप्तजन धास्तावलेले आहेत. इराणवर इस्रायली आणि अमेरिकेच्या संयुक्त हल्ल्यानंतर युद्धाचे स्वरूप अधिकच बिकट होत चालले आहे आणि येत्या काळात ते कोणत्या दिशेने जाईल हे सांगणे कठीण आहे. विशेषतः इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडल्यानंतरची इराणची प्रतिक्रिया मध्य पूर्वेतही चिंता निर्माण करत आहे. विविध कारणांसाठी तेथे गेलेल्या भारतीयांना सुरक्षितपणे कसे बाहेर काढायचे ही चिंता सध्या भारताला भेडसावत -आहे आणि ती कामगिरी अतिशय आव्हानात्मक आहे.

अमेरिका इस्त्रायली संयुक्त हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायलला लक्ष्य करत बहरीन, सौदी अरेबिया आणि कतारसह अनेक देशांमधील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले सुरू केल्याने तेथील नागरिकांना कोणत्या अडचणी येत आहेत हे समजण्यासारखे आहे. अर्थातच भारताची प्राथमिक चिंता या भागात अडकलेल्या भारतीयांना परत आणणे ही आहे. कारण संपूर्ण पश्चिम आशिया प्रदेश रणभूमीत बदलला आहे. दरम्यान इतर देशांमधून स्थलांतरित झालेले लोक पळून जाण्याची आस बाळगून आहेत. भारत सरकारने युद्धग्रस्त देशांमधून भारतीयांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले असले तरी ते यशस्वी होण्यासाठी वेळेवर कारवाई करणे आवश्यक आहे. सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने पश्चिम आशियातील वेगाने बदलत असलेल्या परिस्थितीचा आढावा घेत सर्व संबंधित विभागांना घडामोडींमुळे प्रभावित झालेल्या भारतीयांच्या मदतीसाठी आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. युद्धग्रस्त देशांमध्ये भारतीयांची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी संबंधित भारतीय दूतावासांशी चर्चा करण्यात आल्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. भारताने शांतता आणि सुरक्षिततेसाठी तसेच वाद सोडवण्यासाठी संवाद आणि राजनैतिक चर्चेवर भर दिला असला तरी सध्या युद्धग्रस्त भागात अडकलेल्यांच्या तत्काळ सुरक्षित परतीसाठी प्रक्रिया सुरू करण्याची मोठी गरज आहे. खुद्द इराणमध्ये सुमारे दहा हजार भारतीय नागरिक राहतात, शिक्षण घेतात आणि काम करतात तर ४० हजारांहून अधिक भारतीय इस्रायलमध्ये वास्तव्यास आहेत. याव्यतिरिक्त आखाती देश आणि पश्चिम आशियामध्ये अंदाजे एक कोटी भारतीय राहतात. या देशांमध्ये लष्करी तणाव आणि शत्रुत्वामुळे हवाई सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यत्यय आल्याने या देशांमधील विमानतळांवर अडकलेले अनेक भारतीय घरी परतण्यास उत्सुक आहेत. आतापर्यंत भारताने अनेकदा विविध देशांमधील युद्धादरम्यान अडकलेल्या हजारो नागरिकांना सुरक्षित मायदेशात परत आणले असले तरी स्थिती अधिकच बिकट आहे. यावेळी सर्वात मोठे आव्हान हवाई क्षेत्र प्रवासी उड्डाणांसाठी बंद आहे. रशिया आणि युक्रेन युद्धादरम्यानही काही काळ युद्ध थांबवत भारतीय विद्यार्थ्यांची सुटका करण्यात आली होती.

दुबईत अडकलेल्या भारतीयांना घेऊन आलेल्या पहिल्या विशेष विमानातील प्रवाशांनी कथन केलेले अनुभव थरारक आहेत. अडकलेल्या या भारतीयांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. पर्यटनासाठी दुबईत गेलेल्या नागरिकांनी पाठवलेल्या व्हिडिओच्या माध्यमातून त्यांना येणाऱ्या अडचणींची कल्पना येते. गेल्या तीन दिवसांपासून अडकलेल्या या पर्यटकांनी भारत सरकारने आपल्याला लवकरात लवकर येथून बाहेर काढावे अशी आर्त साद घातली आहे. अशीच स्थिती इराण आणि इस्रायलमध्ये आहे आणि इतरही अनेक देशांमध्ये आहे. युद्धग्रस्त भागातून भारतीयांना सुरक्षित परत आणण्यासाठी संवाद आणि राजनैतिक पुढाकार आवश्यक असल्याने युद्धखोर देशांवर जागतिक स्तरावर दबाव आणत भारताला मोहिमेसाठी अनुकूल वातावरण तयार करावे लागेल.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



# ॥ मंगल ॥ पान

## नाम हेच साधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे पुष्कळ लोकांना मनातून फार वाटते, पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते. मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे; तिला सोडून तू ये असे त्याला म्हणणे म्हणजे तू येऊ नकोसफ असे म्हणण्यासारखेच आहे; कारण एखाद्या इसमाला तू ये, पण तुझी सावली आणू नको म्हटले तर कसे शक्य आहे? म्हणून माया ही राहणारच. आपण तिच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत पोहोचायचे कसे हाच प्रश्न आहे; आणि या प्रश्नाचे उत्तर एकच भगवंताचे नाम घेणे. नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तीशिवाय सावलीला अस्तित्त्व नाही, तसे मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही. तसेच तिला स्वतंत्र शक्तीही नाही, कारण व्यक्तीच्या हालचालीप्रमाणेच तिची हालचाल होते. व्यक्ती न दिसली तरी तिची सावली जशी दिसते, त्याप्रमाणे मायेचे अस्तित्व मात्र जाणवते. मायेची सत्ता भगवंतावर नाही. एखादा इसम पूर्व दिशेला चालला आहे, तर त्याची सावली त्याच्यामागून त्याच दिशेने जाईल; त्या सावलीच्या मनात जर दिशा बदलून पश्चिमेकडे जाण्याचे आले तर तिला ते शक्य नाही. तो मनुष्यच जर पश्चिमेकडे जाऊ लागला तरच तिला त्या दिशेकडे जाणे शक्य आहे.

## मना सज्जना...!

# ‘एक राम दशरथ का बेटा’

परम स्नेही मित्रहो,

**मना राघवेवीण आशा नको रे ।**
**मना मानवाची नको कीर्ती तू रे ।**
**जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे ।**
**तया वर्णिता सर्वही श्लाघ्यवाणे**
**॥ १८ ॥**

मागील भागात ‘मृत्यू’ या विषयावरचे गंभीर चिंतन वाचून गोंधळ झाला असेल ना? साहजिकच आहे. परंतु समर्थ जसे आजाराचे निदान करतात तसा उपचारही सुचवतात. चिंतापासून चिंतनाचा प्रवास घडवतात. लोभ, क्षोभ, उद्वेग, वियोग ही सारी मनाला सदैव कुरतडणारी आयुधे आहेत. यांना परास्त करणे अतिशय अवघड असते. परंतु त्यांची धार काही प्रमाणात बोथट करता येते. त्यासाठी मन एकाग्र करता आले पाहिजे.
मग कसे करता येईल मन एकाग्र? ते या श्लोकात समर्थ सांगतात.

**मना राघवे वीण आशा नको रे,**
मना मानवाची नको कीर्ती तू रे... साधकाने सतत राम नाम चिंतन, स्मरण करावे. त्याशिवाय कोणतीही आशा धरू नये. राम नामाचे शिवाय कोणाचीही म्हणजे आप्त स्वकीय, सगेसोयरे, संपत्ती वगैरे यांची कीर्ती वर्णू नये. हे सांगताना समर्थांनी मनाची चंचल अवस्था ओळखून एकाग्रतेची गुरुकिल्ली दिली आहे, असे



समजायला हरकत नाही. राम नामाचे शिवाय अन्यत्र चित्त गुंतवू नको. तो संकटाचे वेळी पाठीराखा म्हणून अवश्य उभा राहतो हा विश्वास ते मनाला देताहेत. समर्थ स्वतःला ‘रामदास’ म्हणवून घेतात हे त्यांच्या रामनामा वरील अपार निष्ठेने द्योतक म्हणता येईल. त्यांची साधना हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. संपूर्ण रामदासी पंथाचे आराध्य दैवत हे राम आहे. त्या शिवाय अन्य दैवत नाही. अन्य कुणाची भक्ति नाही.

आपल्या संस्कृतीत परंपरेने चार पुरुषार्थ सांगितले आहेत.ते पुरुषार्थ चार म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे. यासाठी व्यक्तिने सतत प्रयत्नरत असावे लागते व हे पुरुषार्थ सिद्ध करावे लागतात. याच परंपरेत तुकोबांनी ‘भक्ती’ नावाचा ‘पाचवा’ पुरुषार्थ सांगितला आहे. भक्तीच्या आधारे मानवाला परमार्थ साधता येतो असे त्यांना म्हणायचे असावे. मानव जीवन संपूर्ण आणि संपन्न व्हायचे असेल तर आराध्य दैवतांची एकनिष्ठ भक्ती हवी.

**ज्या वर्णिती वेद शास्त्रे पुराणे,**
तया वर्णिता सर्व ही श्लाघ्यवाण... वेद, शास्त्रात, पुराणात ज्याचे वर्णन आहे, प्रशंसा आहे. अशा प्रभू रामाचे नाव घेणे यासारखे सुख नाही. राम नामाची थोरवी वर्णन करणे त्याचे गुणगान करणे हे सारे प्रशंसनीय. या चरणातील ‘श्लाघ्य’ शब्दाचा अर्थच मुळी स्तुती, प्रशंसा असा आहे. तात्पर्य.. सर्वत्र जगतात ज्याचे नावाची कीर्ती गाजत आहे अशा रामनामाचे सदैव स्मरण ठेवावे. ‘राम’च का? असा प्रश्न पडला असेल ना? तर चला बघूया...

**दासबोधाच्या मधील चरणात ते म्हणतात–**
तुझे तुज नव्हे शरीर । तेथे इतरांचा कोण विचार? आता एक भगवंत साचार । धरी भावार्थबळे । जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावे लागे त्यासी ।
मला त्याने घातले जन्मासी ।
त्यासी कैसे विसरावे?
सांडूनि राम आनंदघन ।
जयाचे मनी विषयचिंतन ।
त्यासी कैसे समाधान ।
लोलंगतासी ।
जयास वाटे सुखचि असावे ।
तेणे रघुनाथ भजनी लागावे ।
स्वजन सकळहि त्यागावे ।
दुःखमूळ जे ।
**आमुचे कुळी रघुनाथ ।**
**रघुनाथे आमुचा परमार्थ ।**
जो समर्थांचाही समर्थ ।
देवा सोडविता ।
रघुनाथ स्मरोनि कार्य करावे ।
ते तत्काळचि सिद्धी पावे ।
‘कर्ता राम’ हे असावे । अभ्यंतरी ।
कर्ता राम, मी नव्हे, आपण । ऐसे सगुण निवेदन ।
निर्गुणी ते अनन्य । निर्गुणचि होईजे ।

आपल्या सर्व कर्माला साक्षी राम आहे हे लक्षात घेऊन कार्य केल्यास ते सिद्धीस जातेच हा विश्वास ते देतात. समर्थ सगुण ईश्वराकडून निर्गुण ईश्वराकडे जाणेसाठी हा भक्ती पंथ आचरणात आणायला सांगताहेत म्हणून हे श्रीराम नाम चिंतन. आपल्या धर्मातील संतानी ‘राम नामाचे महत्त्व’ वेळोवेळी त्यांच्या विविध रचनांमधून मांडले आहे. उदाहरणार्थ– आपण संत कबीर यांचीच ही रचना पाहू–

**कबीर यांचा हा दोहा वाचून राम नामाची महती आपल्याला लक्षात येईल.**

एक राम दशरथ का बेटा ।
एक राम घट घट में बैठा ।
एक राम का सकल पसारा ।
एक राम त्रिभुवन से न्यारा ॥

राम राम सब जगत बखाने ।
आदी राम कोई बिरला जाने ॥
तुम कौन से.राम का जपते जाप?
जिससे कटे न तीनों ताप ॥

**जय जय रघुवीर समर्थ..!**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. ९४२०३८९५४१**

# आदि शक्ति महिषासुर मर्दिनी

एक बार महिषी के गर्भ से उत्पन्न शक्तिशाली महिषासुर ने देवताओं को परस्त कर तीनों लोकों पर आधिपत्य स्थापित कर लिया था। उसने सभी लोकपालों को हटा दिया और स्वर्ग से देवताओं को भी भगा दिया। सभी देवता घबराकर ब्रह्मा, विष्णु और शिव की शरण में गए। सभी ने महिषासुर का सब वृत्तांत कहा सुनाया तथा उसके वध के निमित्त कोई उपाय करने की प्रार्थना की। तब भगवान् विष्णु के मुख से हजारों सूर्यों के समान कांतिमय दिव्य तेज उत्पन्न हुआ। इसके पश्चात, नाना देवताओं के शरीर से तेज पुंज निकले का क्रम प्रारंभ हुआ, इन्द्रादि सभी देवताओं के शरीर से देवाधिपतियों को प्रसन्न करने वाला तेज निकला, भगवान शिव के शरीर से जो तेज निकला, उससे मुख बना, यमराज के तेज से केश बने तथा भगवान् विष्णु के तेज से भुजाएं बनी, चन्द्रमा के तेज से दोनों स्तन, इंद्र के तेज से कटि प्रदेश, वरुण के तेज से जंघा और उरु उत्पन्न हुए, पृथ्वी के तेज से दोनों नितम्ब, ब्रह्माजी के तेज से दोनों चरण, सूर्य के तेज से पैरों की अंगुलियां तथा वसुओं के तेज से हाथों की अंगुलियों का निर्माण हुआ।

कुबेर के तेज से नासिका, प्रजापति के तेज से दन्त पंक्ति, अग्नि के तेज से तीनों नेत्र, संध्या के तेज से भृकुटियां, वायु के तेज से दोनों कान उत्पन्न हुए। इसके बाद शिवजी ने उन्हें अपना शूल, विष्णुजी ने चक्र, अग्नि ने शक्ति, वायु ने धनुष तथा बाण, वरुण ने शंख, इंद्र ने वजरास्त्र तथा अपने श्रेष्ठ हाथी का घंटा, काल ने तलवार तथा ढाल, समुद्र ने हार तथा कभी जीर्ण न होने वाले दो वस्त्र, चूड़ामणि, कुंडल, कटक, बाजूबंद, अर्ध चन्द्र, नूपुर इत्यादि आभूषण तथा ब्रह्माजी ने अक्षर माला तथा कमंडल, उन शक्ति को प्रदान की। विश्वकर्मा ने देवी को अंगुठियां, हिमालय राज ने देवी को वहां स्वरूप सिंह तथा नाना प्रकार के रत्न, धनपति कुबेर ने उन्हें उत्तम सुरा से भरा एक पात्र तथा शेष नागजी ने देवी को नाग हार सहर्ष प्रदान किया। सभी देवताओं ने भी जगन्माता आद्या शक्ति को सम्मानित किया।

इसके बाद समस्त देवों ने मिलकर जगत उत्पत्ति की कारणस्वरूपा देवी की नाना स्तोत्रों से उत्तम स्तुति की। उन देवताओं की स्तुति सुन कर देवी ने घोर गर्जना की, वो विकराल गर्जन महिषासुर को भी चकित कर गया तथा तक्षण ही वो अपनी सेना के साथ देवी से युद्ध करने हेतु पहुंचा। देवी तथा महिषासुर के मध्य युद्ध छिड़ गया। महिषासुर अपने प्रधान सेनापति चिक्षुर तथा दुर्धर, दुर्मुख, बाश्कल, ताम्र तथा विडालवदन जैसे यम-राज के समान भयंकर योद्धाओं से घिरा हुआ था। देवी क्रोध से आंखें लाल कर, सभी योद्धाओं को मार डाला। इसके बाद महिषासुर क्रोध और भय से ग्रस्त होकर देवी की दौर दौड़ा और महिषासुर नाना प्रकार के मायावी रूप धर देवी से युद्ध करने लगा तथा देवी ने भी उन सभी मायावी रूपों को नष्ट कर दिया तथा अंत में अपने खड़ग से महिषासुर का सर काट दिया। इस प्रकार वह महिषासुर मर्दिनी नाम से प्रसिद्ध हुई।

शुम्भ-निशुम्भ, चंड-मुंड और धूम्रक्ष एवं रक्त बीज का वध करने वाली देवी शुम्भ तथा निशुम्भ नाम के दो असुर भाई भंयकर अत्याचारी थे। अपने अपार बल से उन्होंने तीनों लोक पर अपना राज स्थापित कर देवताओं को अमरावती पुरी से निकाल दिया। उनकी सेना में ही धूम्रक्ष, चंड, मुंड और रक्तबीज जैसे महाबलशाली असुर थे। शुम्भ-निशुम्भ के आतंक से भयभित होकर समस्त देवताओं ने हिमालय पर जाकर शरण ली। वहां पर उन्होंने सर्व मनोकामनाओं को पूर्ण करने वाली आदिशक्ति देवी की स्तुति की। देवताओं की स्तुति करने पर माता गौरी देवी अत्यंत प्रसन्न हुई तथा देवताओं से पूछा कि अप लोग किसकी स्तुति कर रहे हैं? देखते ही देखते शिवा देवी के शरीर से एक कुमारी कन्या का प्राकट्य हुआ तथा कुमारी कन्या ने देवी शिवा को कहा कि शुम्भ तथा निशुम्भ नमक दैत्यों से प्रताड़ित ये सब आप की ही स्तुति कर रहे हैं।

उस कन्या का प्रादुर्भाव शिवा से हुआ तथा वो कौशिकी नाम से विख्यात हुई। कौशिकी ही साक्षात् शुम्भ का वध करने वाली सरस्वती हैं तथा उन्हें ही उग्र तारा या महोग्रतारा कहा गया हैं। देवी कौशिकी ने देवताओं से कहा, तुम लोग निर्भय हो जाओं। मैं स्वतंत्र हूं, बिना किसी सहारे के मैं तुम लोगों का कार्य सिद्ध कर दूंगी तथा तक्षण ही वहां से वह अंर्तध्यान हो गई।

तदनंतर एक दिन शुम्भ तथा निशुम्भ के सेवक चण्ड तथा मुंड ने देवी के स्वरूप को देखा, उनका मनोहर रूप को देख कर वो चकित हो कर सुध-बुध खो बैठे। दोनों ने जाकर अपने स्वामी को कहा, एक अपूर्व सुंदरी हिमालय पर रहती हैं तथा सिंह पर सवारी करती हैं। यह सुन कर शुम्भ ने अपने दूत सुग्रीव को देवी के पास प्रस्ताव देकर भेजा तथा प्रयत्न पूर्वक देवी को ले आने की आज्ञा दी। दूत देवी के पास गया तथा कहा कि देवी! दैत्यराज शुम्भ, अपने महानबल तथा विक्रम के लिए तीनों



लोकों में विख्यात हैं तथा उनका छोटा भाई निशुम्भ भी समान प्रतापी हैं। शुम्भ ने मुझे तुम्हारे पास दूत बना कर भेजा हैं। शुम्भ ने जो सन्देश दिया हैं उसे सुनो! मैंने युद्ध में इंद्र आदि देवताओं को पराजित कर, उनसे समस्त रत्नों का हरण कर लिया हैं, यज्ञ में दिया हुआ देव भाग में स्वयं ही भोगता हूं। तुम स्त्रियों में रत्न हो तथा सब रत्नों की शिरोमणि हो, तुम कामजनित रस के साथ मुझे या मेरे भाई को अंगीकार करो। यह सुनकर कौशिकी देवी ने कहा, ‘तुम्हारा कथन असत्य नहीं हैं, परन्तु मैंने पूर्व में एक प्राण लिया हैं उसे सुनो! जो मेरा घमंड चूर कर, मुझे युद्ध में जीत लेगा, उसी को में अपने स्वामी रूप में वरण कर सकती हूं, यह मेरा दृढ़ प्रण हैं। तुम शुम्भ तथा निशुम्भ को मेरी यह प्रतिज्ञा बता दो, तदनंतर इस विषय में वो जैसा उचित समझें करें।

देवी का ऐसा वचन सुन कर, दूत सुग्रीव वापस शुम्भ के पास चला आया तथा उसने देवी का संदेश सुना दिया। दूत की बातें सुन कर शुम्भ कुपित हो उठा तथा अपने श्रेष्ठ सेनापति धूम्राक्ष को हिमालय पर जा कर, देवी जिस भी अवस्था पर हो ले आने के लिए कहा। दैत्य धूम्राक्ष हिमालय पर जा, भगवती भुवनेश्वरी से कहां- मेरे स्वामी के पास चलो नहीं तो में तुम्हें मार डालूइगा। देवी ने कहा- युद्ध के बिना मेरा शुम्भ के पास जाना असंभव हैं, यह सुनकर धूम्राक्ष देवी को पकड़ने के लिए दौड़ा, लेकिन देवी ने ‘हूं’ के उच्चारण मात्र से उसे भस्म कर दिया। धूम्राक्ष को मस्म करने के आरण देवी धूम्रलोचन और धूमावती कहलाई।

धूम्रक्ष की मृत्यु का समाचार पा कर शुम्भ बड़ा ही कुपित हुआ तथा उसने चण्ड एवं मुंड तथा रक्तबीज नामक असुरों को देवी के पास भेजा। दानव गणों ने, देवी के सन्मुख जा शीघ्र ही शुम्भ के पास जा कर उसे पति बनाने का आदेश दिया, अन्यथा गणों सहित मार डालने का भय दिखाया।

देवी ने कहा कि में सदाशिव के सूक्ष्म प्रकृति हूं, फिर किसी दूसरे की पत्नी कैसे बन सकती हूं। दैत्यों या तो तुम अपने अपने स्थानों को लौट जाओ अन्यथा मेरे साथ युद्ध करो। तब युद्ध हुआ चण्ड तथा मुंड का वध करने पर देवी चामुंडा नाम से विख्यात हुई और रक्तबीज का वध देवी कालीका ने किया।

इस प्रकार शुम्भ को जब ये समाचार प्राप्त हुआ तो उसने दुर्जय गणों को युद्ध के लिए भेजा। कालक, कालकेय, मौर्य, दौर्हृद तथा अन्य असुरगण भरी सेना को साथ ले कर, दोनों भाई शुम्भ तथा निशुम्भ रथ पर आरूढ़ हो देवी से युद्ध करने के लिए निकले। हिमालय पर्वत पर खड़ी हुई देवी को देख कर सभी उनकी और दौड़ें और युद्ध करने लगे।

देवी कालिका तथा उनकी सहचरियों ने दैत्यों को मरना शुरू कर दिया तथा देवी के वाहन सिंह ने भी कई दैत्यों का भक्षण कर लिया। दैत्यों के मारे जाने के कारण, रण-भूमि में रक्त की धार, नदिया बहने लगी। घोर युद्ध छिड जाने पर, दैत्यों का महान संहार होने लगा, देवी ने विष में बुझे हुए तीखे बाणों से निशुम्भ को मार कर धराशायी कर दिया। अपने भाई निशुम्भ के मारे जाने पर शुम्भ क्रोध से भर गया तथा अष्ट भुजाओं से युक्त हो देवी के पास आकर युद्ध करने लगा। बड़ा भयंकर दृश्य उपस्थित हुआ। चंडिका ने त्रिशूल से शुम्भ पर प्रहार किया, जिससे वो पृथ्वी पर गिर गया। शूल के आघात से होने वाली व्यथा को सहकर, शुम्भ ने 10 हजार भुजाएं धारण कर ली तथा चक्र द्वारा देवी के वाहन सिंह तथा देवी पर आक्रमण करना प्रारंभ कर दिया तथा देवी ने खेल-खेल में उन चक्रों को विदीर्ण कर दिया। तदनंतर, देवी ने त्रिशूल के प्रहार से असुर शुम्भ को मार गिराया।

रक्तबीज का वध ब्रह्माजी के शरीर से ब्राह्मी, विष्णु से वैष्णवी, महेश से महेश्वरी और अम्बिका से चंडिका प्रकट हुईं। पलभर में सारा आकाश असंख्य देवियों से आच्छादित हो उठा। ब्राह्मणी ने अपने कमंडल से जल छिड़का जिससे राक्षस तेजहीन होने लगे, वैष्णवी अपने चक्र, महेश्वरी अपने त्रिशूल से, इन्द्राणी वज्र से और सभी देवियां अपने अपने आयुधों से आक्रमण कर रही थीं। राक्षस सेना भागने लगीं।

तब रक्तबीज ने राक्षसों को धिक्कारा कि वे स्त्रियों से डरकर भाग रहे हैं? रक्तबीज हमला करने आया, तो इन्द्राणी ने उस पर शक्ति चलाई जिससे उसका सर कट गया और रक्त भूमि पर गिरा। किंतु पूर्व वरदान के प्रभाव से उस रक्त से फिर एक रक्तबीज उठ खड़ा हुआ और अट्टहास करने लगा। जैसे ही शक्तियां उसे मारतीं, उसके रक्त से और असुर उठ खड़े होते। जल्द ही असंख्य रक्तबीज सब और दिखने लगे।

**भाग–३**

मां चंडिका ने श्रीकाली से कहा कि इसका रक्त भूमि पर गिरने से रोकना होगा जिससे और रक्तबीज न जन्में। देवी काली ने कहा कि आप सब इन्हें मारें, मैं एक बूंद रक्त भी भूमि पर न पड़ने दूंगी। और ऐसा ही हुआ भी, जल्द ही सारे नए रक्तबीज युद्ध में मारे गए। तब रक्तबीज समझ गया कि काली उसे पुनर्जीवित नहीं होने दे रही हैं, तो वह चंडिका को मारने दौड़ा। तब चंडिका ने उसे मार दिया और काली ने रक्त को भूमि पर न गिरने दिया। देवता चंडिका की जय-जयकार करने लगे।

**महाकाली की उत्पत्ति कथा**

श्रीमार्कण्डेय पुराण एवं श्रीदुर्गा सप्तशती के अनुसार महाकाली मां की उत्पत्ति जगत जननी मां अम्बा के ललाट से हुई थी।
कथा के अनुसार शुम्भ-निशुम्भ दैत्यों के आतंक का प्रकोप इस कदर बढ़ चुका था कि उन्होंने अपने बल, छल एवं महाबली असुरों द्वारा देवराज इन्द्र सहित अन्य समस्त देवतागणों को निष्कासित कर स्वयं उनके स्थान पर आकर उन्हें प्राणरक्षा हेतु भटकने के लिए छोड़ दिया। दैत्यों द्वारा आतंकित देवों को ध्यान आया कि महिषासुर के इन्द्रपुरी पर अधिकार कर लिया है, तब दुर्गा ने ही उनकी मदद की थी। तब वे सभी दुर्गा का आह्वान करने लगे।

उनके इस प्रकार आह्वान से देवी प्रकट हुईं एवं शुम्भ-निशुम्भ के अति शक्तिशाली असुर चंड तथा मुंड दोनों का एक घमासान युद्ध में नाश कर दिया। चंड-मुंड के इस प्रकार मारे जाने एवं अपनी बहुत सारी सेना का संहार हो जाने पर दैत्यराज शुम्भ ने अत्यधिक क्रोधित होकर अपनी संपूर्ण सेना को युद्ध में जाने की आज्ञा दी तथा कहा कि आज छियासी उदायुद्ध नामक दैत्य सेनापति एवं कम्बु दैत्य के चौरासी सेनानायक अपनी वाहिनी से घिरे युद्ध के लिए प्रस्थान करें। कोटिवीर्य कुल के पचास, धौम्र कुल के सौ असुर सेनापति मेरे आदेश पर सेना एवं कालक, दौर्हृद, मौर्य व कालकेय असुरों सहित युद्ध के लिए कूच करें। अत्यंत क्रूर दुष्टाचारी असुर राज शुंभ अपने साथ सहस्र असुरों वाली महासेना लेकर चल पड़ा।

उसकी भयानक दैत्यसेना को युद्धस्थल में आता देखकर देवी ने अपने धनुष से ऐसी टंकार दी कि उसकी आवाज से आकाश व समस्त पृथ्वी गूंज उठी। पहाड़ों में दरारें पड़ गईं। देवी के सिंह ने भी दहाड़ना प्रारंभ किया, फिर जगदम्बिका ने घंटे के स्वर से उस आवाज को दुगना बढ़ा दिया। धनुष, सिंह एवं घंटे की ध्वनि से समस्त दिशाएं गूंज उठीं। भयंकर नाद को सुनकर असुर सेना ने देवी के सिंह को और मां काली को चारों ओर से घेर लिया। तदनंतर असुरों के संहार एवं देवगणों के कष्ट निवारण हेतु परमपिता ब्रह्माजी, विष्णु, महेश, कार्तिकेय, इन्द्रादि देवों की शक्तियों ने रूप धारण कर लिए एवं समस्त देवों के शरीर से अनंत शक्तियां निकलकर अपने पराक्रम एवं बल के **साथ मां दुर्गा के पास पहुंचीं।**
तत्पश्चात समस्त शक्तियों से घिरे शिवजी ने देवी जगदम्बा से कहा– ‘मेरी प्रसन्नता हेतु तुम इस समस्त दानव दलों का सर्वनाश करो।’ तब देवी जगदम्बा के शरीर से भयानक उग्र रूप धारण किए चंडिका देवी शक्ति रूप में प्रकट हुईं। उनके स्वर में सैकड़ों गीदड़ों की भांति आवाज आती थी।

असुरराज शुम्भ-निशुम्भ क्रोध से भर उठे। वे देवी कात्यायनी की ओर युद्ध हेतु बढ़े। अत्यंत क्रोध में चूर उन्होंने देवी पर बाण, शक्ति, शूल, फरसा, ऋषि आदि अस्त्रों-शस्त्रों द्वारा प्रहार प्रारंभ किया। देवी ने अपने धनुष से टंकार की एवं अपने बाणों द्वारा उनके समस्त अस्त्रों-शस्त्रों को काट डाला, जो उनकी ओर बढ़ रहे थे। मां महाकाली फिर उनके आगे-आगे शत्रुओं को अपने शूलादि के प्रहार द्वारा विदीर्ण करती हुई व खट्वांग से कुचलती हुईं समस्त युद्धभूमि में विचरने लगीं। सभी राक्षसों चंड मुंडादि को मारने के बाद उसने रक्तबीज को भी मार दिया।

शक्ति का यह अवतार एक रक्तबीज नामक राक्षस को मारने के लिए हुआ था। फिर शुम्भ-निशुंभ का वध करने के बाद भी जब महाकाली मां का गुस्सा शांत नहीं हुआ, तब उनके गुस्से को शांत करने के लिए भगवान शिव उनके रास्ते में लेट गए और काली मां का पैर उनके सीने पर पड़ गया। शिव पर पैर रखते ही माता का क्रोध शांत होने लगा।

**मधु और कैटभ की देवी**

जब धरती पर जल की अधिकता थी। सब और जल ही जल था और भगवान विष्णु शेषनाग की शैय्या पर सोए हुए थे। तब उनके कान की मैल से मधु और कैटभ नाम के दो महापराक्रमी दानव उत्पन्न हुए। मार्कण्डेय पुराण के अनुसार उमा ने कैटभ को मारा था, जिससे वे ‘कैटभा’ कहलाईं। महाभारत और हरिवंश पुराण का मत है कि इन असुरों के मेदा के ढेर के कारण पृथ्वी का नाम ‘मेदिनी’ पड़ा था। पद्मपुराण के अनुसार देवासुर संग्राम में ये हिरण्याक्ष की ओर थे।
कथा मधु और कैटभ दोनों भाईयों ने देवी भगवती महाशक्ति की कठिन तपस्या की। देव जब प्रकट हुई तो उन्होंने कहा वर मांगों। दोनों के कहा देवि! तुम हमें स्वेच्छामरण का वर देने की कृपा करो।’ देवी ने कहा– ‘दैत्यो! मेरी कृपा से इच्छा करने पर ही मौत तुम्हें मार सकेगी। देवता और दानव कोई भी तुम दोनों भाइयों को पराजित नहीं कर सकेंगे।’

देवी के वर देने पर मधु और कैटभ को अत्यन्त अभिमान हो गया और वे देवी और देवताओं पर सहित अन्य प्राणियों पर भी अत्याचार करने लगे। एक दिन अचानक उनकी नजर प्रजापति ब्रह्माजी पर पड़ी। ब्रह्माजी कमल के आसन पर विराजमान थे। उन दैत्यों ने ब्रह्माजी से कहा– ‘सुव्रत! तुम हमारे साथ युद्ध करो। यदि लड़ना नहीं चाहते तो इसी क्षण यहां से चले जाओ, क्योंकि यदि तुम्हारे अन्दर शक्ति नहीं है तो इस उत्तम आसन पर बैठने का तुम्हें कोई अधिकार नहीं है।’ मधु और कैटभ की बात सुनकर ब्रह्माजी चिंतित होकर वहां से पलायन कर विष्णु की शरण में चले गए। उस समय श्रीहरि विष्णु योगनिद्रा में निमग्न थे। तब उन्होंने भगवती योगनिद्रा की स्तुति करते हुए कहा– ‘भगवती! मैं मधु और कैटभ के भय से भयभीत होकर तुम्हारी शरण में आया हूं। कुछ करो तुम सम्पूर्ण जगत की माता हो। यदि मैं दैत्यों के हाथ से मारा गया तो तुम्हारी बड़ी अपकीर्ति होगी। अतः तुम भगवान विष्णु को जगाकर मेरी रक्षा करो।’
ब्रह्माजी की प्रार्थना सुनकर भगवती भगवान विष्णु के नेत्र, मुख, नासिका, बाहु और हृदय से निकल कर आकाश में स्थित हो गईं और भगवान उठकर बैठ गए। तब श्रीविष्णु ने मधु और कैटभ से घोर युद्ध किया, लेकिन वे किसी भी तरह से उन्हें परास्त करने में असफल रहे।

फिर विचार करने पर भगवान को ज्ञात हुआ कि इन दोनों दैत्यों को भगवती ने इच्छामृत्यु का वरदान दे रखा है।
भगवती की कृपा के बिना इनको मारना असम्भव हैं इतने में ही उन्हें भगवती योगनिद्रा के दर्शन हुए। भगवान ने रहस्यपूर्ण शब्दों में भगवती की स्तुति की। भगवती ने प्रसन्न होकर कहा– ‘विष्णु! तुम देवताओं के स्वामी हो।

मैं इन दैत्यों को माया से मोहित कर दूंगी, तब तुम इन्हें मार डालना।’ भगवती का अभिप्राय समझकर भगवान ने दैत्यों से कहा कि तुम दोनों के युद्ध से मैं परम प्रसन्न हूं। अतः मुझसे इच्छानुसार वर मांगो।

दैत्य भगवती की माया से मोहित हो चुके थे। उन्होंने कहा– ‘विष्णो! हम याचक नहीं हैं, दाता हैं। तुम्हें जो मांगना हो हम से प्रार्थना करो। हम देने के लिए तैयार हैं।’
भगवान बोले– ‘यदि देना ही चाहते हो तो मेरे हाथों से मृत्यु स्वीकार करो।’ योगमाया से मोहित होकर मधु और कैटभ अपनी ही बातों में उलझ गए। तब भगवान विष्णु ने दैत्यों के मस्तकों को अपनी जांघों पर रखवाकर सुदर्शन चक्र से काट डाला। इस प्रकार मधु और कैटभ का अन्त हुआ।

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**